0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक १६/१०/२०१२ रोजी प्राप्त झालेले अहवाल व त्यासोबतचे कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७०/२०१२/जा.७३४, दिनांक १८/१०/२०१२, ०७/११/२०१२, ३०/११/२०१२ व १९/१२/२०१२.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २२/१०/२०१२, ०७/११/२०१२ व ३०/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदने.

४) टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ चा मालक नबी रजा व मेहराज चौधरी यांचे दिनांक ०३/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त स्वतंत्र लेखी निवेदने.

५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक १८/१२/२०१२ रोजीचे अभिवेदन.

६) टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ चा चालक मोहम्मद इसहाक कुरेशी याचे दिनांक ०७/०१/२०१३ रोजीचे निवेदन.

७) मे. शुक्ला ट्रेडिंग कंपनी यांचे दिनांक ०७/०१/२०१३ रोजीचे निवेदन.

८) मे. शुक्ला ट्रेडिंग कंपनीचे मालक अशोककुमार अरुणकुमार शुक्ला यांनी दिनांक ०८/०१/२०१३ रोजी दिलेला जबाब.

९) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून प्राप्त झालेला रासायनिक पृथ:करण अहवाल.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७०/२०१२/जा.२०६
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २६/०३/२०१३.

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ३१/०८/२०१२ रोजी सकाळी १०:३० वाजता श्री. मधुकर गुलाब गिरी, सहाय्यक शिधावाटप अधिकारी, ३२/ई, कुर्ला, मुंबई यांना या कार्यालयाच्या आदेशानुसार श्री. कळंबे, उपनियंत्रक शिधावाटप, ई

परिमंडळ, वडाळा, मुंबई यांनी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून, साकीनाका पोलिस ठाणे येथे शिधावाटप निरीक्षक सर्वश्री एस.आर.पवार, जी.पी. पवार यांच्या समवेत उपस्थित राहून साकीनाका पोलिस ठाणे येथील पोलिस उप निरिक्षक श्री. लांडगे यांनी पकडलेल्या ०३ टँकर्सची तपासणी करुन नियमानुसार कायदेशीर कारवाई करावी असे आदेश दिले. त्याप्रमाणे वरील नमूद असे सर्व मिळून साकीनाका पोलिस ठाणे येथे ११:०० वाजता उपस्थित राहिले. तेथे दोन पंचांनां पाचारण करुन घेण्यात आले.

दिनांक ३१/०८/२०१२ रोजी साकीनाका पोलिस ठाण्याचे पोलिस उप निरिक्षक श्री. अशोक लांडगे यांनी पहाटे ०३:४५ वाजता वुडलँड हाईटस् बिल्डिंग समोरील कंपाऊंड, संघर्षनगर, साकीनाका, मुंबई - ७२ येथे घटनास्थळी केलेला पंचनामा व त्यानुसार पंचाच्या सह्यानिशी सदर पंचनाम्यात नमूद केलेले १) टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३, २) टँकर क्र. एमएच-०४-बीजी-६९२४ व ३) टँकर क्र. एमएच-०४-एच-९६४८ या तिन्ही टँकरचे सिल बंद असल्याचे आढळून आले. सदर तिन्ही टँकरमधील द्रवपदार्थाची तपासणी तसेच नमूने काढण्याकरिता वर नमूद तिन्ही टँकरचे सील पंचासमक्ष तसेच साकीनाका पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरिक्षक श्री. अशोक लांडगे यांच्या समक्ष उघडयात आले व त्यामध्ये असलेल्या द्रवपदार्थाची तपासणी केली असता, टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ यामध्ये ३८०० लिटर काळे तेल असल्याचे आढळले. टँकर क्र. एमएच-०४-बीजी-६९२४ यामध्ये २०० लिटर काळे तेल असल्याचे आढळले. तसेच टँकर क्र. एमएच-०४-एच-९६४८ यामध्ये ६००० लिटर काळे तेल असल्याचे आढळले. सदर तिन्ही टँकरमधून अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष नमूने घेण्यात आले. नमूद तिन्ही टँकरमधून काढलेल्या बाटल्यांतील नमुने पंचाच्या सही शिक्क्यानिशि जागीच सिलबंद केले. तसेच तिन्ही टँकरचे सर्व कॉक पंचाच्या सही शिक्क्यानिशि सिलबंद केले.

टँकर चालक मोहम्मद यासीन मोहम्मद इसाहाक कुरेशी यांनी दिलेल्या जबाबानुसार तसेच त्याच्याकडे वर नमूद तिन्ही टँकरमधील असलेल्या द्रव पदार्थाची चलने/ईनव्हाईस इत्यादी दस्तऐवज पोलिसांनी घेतलेल्या झाडझडतीत आढळून आले नाहीत.

अशाप्रकारे टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ चा चालक मोहम्मद इसाहाक कुरेशी व मालक नबी रजा आणि काळ्या तेलाची तस्करी करणारा मेहराज शेठ तसेच टँकर क्र. एमएच-०४-एच-९६४८ चा चालक व मालक आणि टँकर क्र. एमएच-०४-बीजी-६९२४ चा चालक व मालक असे सर्वांनी मिळून संगनमताने अवैध मार्गाने काळे तेल हस्तगत करुन अनधिकृतपणे त्यामध्ये भेसळ करुन ते काळ्याबाजारात अवैध मार्गाने विक्रीसाठी वापर करीत असल्याचे सकृतदर्शनी निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD ...

संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व १०, २) दि ल्युब्रिकेटिंग ऑईल्स ॲण्ड ग्रिसेस (प्रोसेसिंग, सप्लाय ॲण्ड डिस्ट्रिब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ चे कलम ३, ४, ५ व ६ तसेच ३) दि पेट्रोलियम प्रॉडेक्ट (मेनटेन ऑफ प्रॉडक्शन स्टोरेज ॲन्ड सप्लायर्स) ऑर्डर १९९९ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.नों.क्र. ३०/२०१२, दिनांक ३१/०८/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला व सदरचा जप्त मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ | १ नग | १२,००,०००/- |
| २ | उक्त टँकरमधील काळे तेल | ३८०० लिटर | ४,१८,०००/- |
| ३ | टँकर क्र. एमएच-०४-बीजी-६९२४ | १ नग | ५,००,०००/- |
| ४ | उक्त टँकरमधील काळे तेल | २०० लिटर | २२,०००/- |
| ५ | टँकर क्र. एमएच-०४-एच-९६४८ | १ नग | ५,००,०००/- |
| ६ | उक्त टँकरमधील काळे तेल | ६००० लिटर | ६,६०,०००/- |
| | | एकूण | ३३,००,०००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०६/११/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०६/११/२०१२ रोजीची सुनावणी प्रशासकिय कारणास्तव रद्द करण्यात आली. तथापी, सदर सुनावणीच्या दिवशी ॲड. रमेश मिश्रा यांनी मेराज चौधरी, नबी रजा व मो यासीन यांचे वतीने वकालतनामा सादर करुन लेखी म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुढील सुनावणी दिनांक २९/११/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २९/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ चा मालक नबी रजा, काळ्या तेलाचा तस्करी करणारा मेहराज हे उपस्थित राहिले. परंतू लेखी निवेदन सादर केले नाही. सुनावणीस उपस्थित मेहराज यांनी ते टँकर क्र. एमएच-०४-एच-९६४८ व टँकर क्र. एमएच-०४-बीजी-६९२४ चे मालक असल्याचे सांगितले. तथापी, सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित

राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुढील सुनावणी दिनांक १८/१२/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस साकीनाका पोलिस ठाणे येथील पोलिस उप निरिक्षक श्री. अशोक पोपटलाल लांडगे यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ५ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले व पृथ:करण अहवाल अप्राप्त असल्याने नमूद गुन्ह्यातील तीनही टँकर त्यांच्या मालकास परत करण्यास सक्त हरकत घेतली असून सदरचे टँकर त्यांच्या मालकास परत केल्यास ते पुन्हा बेकायदेशिर धंदा चालू करतील असे सांगितले. सदर प्रकरणी मेहराज चौधरी यांनी दिनांक ०३/१२/२०१२ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनाचे अवलोकन केले असता, त्यांनी फर्नेस ऑईल खरेदीचे बिले सादर केली आहेत. फर्नेस ऑईल हे पेट्रोलीयम पदार्थ असल्याने त्याची विक्री थेट सरकारी तेल कंपन्याकडून होणे अपेक्षित असतांना मेहराज चौधरी यांनी मे. शुक्ला ट्रेडिंग कंपनी यांचे कडील खरेदी बिले सादर केली आहे. याबाबत अधिक खातरजमा करण्याकरिता संबंधितांना तसेच उर्वरीत अनुपस्थितीत इसमांना त्यांचे म्हणणे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०८/०१/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०८/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ चा चालक मोहम्मद इसाहाक कुरेशी यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ६ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस काळ्या तेलाची तस्करी करणारा मेहराज शेठ यांनी उपस्थित राहून यापूर्वी टपालामार्फत सादर केलेले लेखी निवेदन कायम असल्याचे सांगितले. सदर सुनावणीसही मे. शुक्ला ट्रेडिंग कंपनी व इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, मेहराज चौधरी यांनी सादर केलेल्या खरेदी बिलानुसार घटनास्थळी मिळून आलेला काळे तेलाचा साठा हा कोणी पुरवठा केला, याबाबत अधिक खातरजमा करण्यासाठी या कार्यालयाचे फिरते पथकास पाचारण करण्यात आले.

तद्नंतर फिरते पथकामार्फत दिनांक ०८/०१/२०१३ रोजी मे. शुक्ला ट्रेडींग कंपनी, गाळा क्र. एम-३, स्वस्तिक इंडस्ट्रियल इस्टेट, धर्मकाटाच्यामागे, भाइंदर (पूर्व) या ठिकाणी भेट दिली असता, मे. शुक्ला ट्रेडींग कंपनी चे मालक अशोककुमार अरुणकुमार शुक्ला यांनी वाचावे क्र. ८ अन्वये दिलेल्या जबाबात, मी शुक्ला ट्रेडींग कंपनी या नावाने गाळा क्र. एम-३, स्वस्तिक इंडस्ट्रियल इस्टेट, धर्मकाटाच्यामागे, भाइंदर (पूर्व) या पत्यावर सन १९९७ पासुन फर्नेस ऑईल व एलडीओ चा फेरविक्रेत्याचा व्यवसाय करीत आहे. फर्नेस ऑईल व एलडीओची खरेदी इंडीयन ऑईल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम व हिंदुस्थान पेट्रोलियम या कंपनीचे अधिकृत डिलर्स असलेले मे. हरेश एजन्सी, आर जी चांडक, डी एम के पेट्रो ट्रेडर्स यांचेकडून करीत असतो. सदर व्यवसायाबाबतचे गुमास्ता परवाना

CONTROLLER OF RATIONING ... HE

क्र. ८०५२९ दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत वैध असलेला मिरा भाईंदर महानगरपालिका, अग्नीशमन दलाचे ना हरकत पत्र, विस्फोटक परवान्याबाबत पत्र अधिकाऱ्यांना दाखविले. दिनांक ३०/०८/२०१२ रोजी मे. चौधरी एन्टरप्रायजेसचे मालक मेहराज चौधरी याच्या भ्रमणध्वनीवरील ऑर्डरनुसार बिल क्र. १६७ दिनांक ३०/०८/२०१२ नुसार ४००० लिटर फर्नेस ऑईलची विक्री केली आहे. सदर फर्नेस ऑईलची डिलेव्हरी त्यांनी पाठविलेल्या टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ मधुन गाळा क्र. १ आणि २ नायरवाडी, खैरानी रोड, साकीनाका, अंधेरी पूर्व, मुंबई या पत्यावर केलेली आहे. मेहराज चौधरी यांचा घटनास्थळी पोलिसांनी पकडलेल्या मालाशी माझा कोणताही संबंध नाही. वुडलॅन्ड हाईटस् बिल्डींग समोरील कंपाऊंड संघर्ष नगर, साकीनाका, मुंबई-७२ या घटनास्थळी आढळलेल्या मालाचा पुरवठा मी केलेला नसुन गाळा क्र. १ आणि २, नायरवाडी, खैरानीरोड, साकीनाका, मुंबई या पत्यावर फर्नेस ऑईलची डिलेव्हरी केलेली आहे. दिनांक ०१/०९/२०१२ पूर्वीचे फर्नेस ऑईलचे साठा पुस्तकाबाबत अधिकाऱ्यांनी माझेकडे विचारणा केली असता सदरचे साठा पुस्तक एक्साईज कार्यालय, मुंबई येथील अधिकाऱ्यांनी मे. वर्धमान मेटल, वसई येथे टाकलेल्या धाडीच्या अनुषंगाने तपासणीकरीता घेऊन गेले आहेत. असे नमुद आहे.

तद्नंतर वाचावे क्र. ९ अन्वये प्राप्त झालेल्या जप्त मुद्देमालाच्या रासायनिक पृथःकरण अहवालात, Exhibit nos. 1 to 3 contains petroleum hydrocarbon oil having density at 30°C 0.963, 0.963, 0.963 g /ml and flash point 74, 69 & 74 °C respectively, असे नमूद केले आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

COLLECTOR OF CIVIL SUPPLIES ... D OFFICE ... MUMBAI

युक्तीवाद :-

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २२/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, टँकर क्रमांक एमएच-०४-एफजे-२७१३ चा चालक मोहम्मद इसहाक कुरेशी व मालक नबी रजा आणि काळया तेलाची तस्करी करणारा मेहराज शेठ तसेच टँकर क्रमांक एमएच-०४-एच-९६४८ व एमएच-०४-बीजी-६९२४ चे चालक व मालक या सर्वांनी मिळून संगनमताने अवैध मार्गाने काळे तेल हस्तगत करुन अनधिकृतपणे त्यामध्ये भेसळ करुन ते काळयाबाजारात अवैधमार्गाने विक्रीसाठी वापर करत असल्याचे निष्पन्न झाले असुन सदरचे तिनही टँकर्स त्यांच्या मालकास परत देण्यास सक्त हरकत असल्याचे नमुद आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक ०७/११/२०१२ व ३०/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये सर्व आरोपींना अटक करण्यात आले असून ते सध्या मा. न्यायालयाच्या आदेशान्वये जामीनावर मुक्त आहेत. त्यांना सदरचे मो/टॅकर्स परत मिळाल्यास ते पुन्हा सदरचा बेकायदेशीर धंदा चालू करतील. याकरिता रासायनिक विश्लेषक विभागाकडून तपासणी अहवाल मिळेपर्यंत सदरचे तिन्ही मो/टॅकर्स क्रमांक एमएच-०४-एफजे-२७१३, एमएच-०४-एच-९६४८ व एमएच-०४-बीजी-६९२४ हे टॅंकर मालकास परत देण्यास पोलिसांची सक्त हरकत आहे, असे नमूद आहे.

टॅंकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ चा मालक नबी रजा याचे दिनांक ०३/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, ते टॅंकर क्रमांक एमएच-०४-एफजे-२७१३ चे मालक असुन त्यांचे वाहन टॅंकर क्रमांक एमएच-०४-एच-९६४८ व एमएच-०४-बीजी-६९२४ या दोन्ही वाहनांसोबत पोलिसांनी जप्त केले आहे. त्यांनी त्यांचे टॅंकर श्री मेहराज चौधरी यांना दिले असुन सदरहु टॅंकरमधील साठयाबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे नमुद केले आहे. सदर टॅंकरवर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबुन असल्याने तसेच त्यांना कोटक महिंद्रा बॅंकेचे मासिक हप्ते भरावयाचे असल्याने त्यांना टॅंकर परत करण्याची विनंती केली.

मेहराज चौधरी याचे दिनांक ०३/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, ते गाळा क्र. १ आणि २ नायरवाडी, खैरानी रोड, साकीनाका, अंधेरी पूर्व, मुंबई या पत्यावर फर्नेस ऑईलचा व्यवसाय करीत असुन निवेदनासोबत नमुद व्यवसायाच्या पत्यावरील गुमास्ता परवाना, व्हॅट नोंदणी तसेच केंद्रीय विक्रीकर प्रमाणपत्राची प्रत जोडली आहे. टॅंकर क्रमांक एमएच-०४-एच-९६४८ व एमएच-०४-बीजी-६९२४ या दोन्ही वाहनांची ते मालक असुन सदरचे दोन्ही टॅंकर पोलिसांनी टॅंकर क्रमांक एमएच-०४-एफजे-२७१३ या टॅंकरसोबत जप्त केले आहे. पोलिसांनी साठा जप्त केल्यावेळी ते घटनास्थळी उपस्थित नव्हते. टॅंकर क्रमांक एमएच-०४-बीजी-६९२४ मध्ये फर्नेस ऑईलचा साठा आहे. तसेच टॅंकर क्रमांक एमएच-०४-एच-९६४८ मध्ये ६००० लिटर काळे तेल हे चुकीचे नमुद असुन सदरचे टॅंकर हे रिकामे होते. टॅंकर क्रमांक एमएच-०४-एफजे-२७१३ हे श्री नबी रजा यांच्या मालकीचे असुन सदर टॅंकरमधील ऑईल हे फर्नेस ऑईल आहे. सदर फर्नेस ऑईलचा ४००० किलो साठा त्यांनी मे. शुक्ला ट्रेडींग कंपनी यांचेकडून खरेदी केला असुन मे. शुक्ला ट्रेडींग यांनी डीएमके पेट्रो प्रॉडक्टस् ॲन्ड कॅरीयर प्रा.लि. यांचेकडून खरेदी केलेला आहे. सदर फर्नेस ऑईलचा साठा हा जीवनावश्यक वस्तु नसल्याने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम त्यास लागु होत नाही. सदर टॅंकरचा त्यांचा उदरनिर्वाह अवलंबुन असल्याने तसेच टॅंकर क्रमांक एमएच-०४-एफजे-२७१३ व एमएच-०४-बीजी-६९२४ मधील फर्नेस ऑईलचा साठा त्यांना परत करण्यात

0007 यांवी. तसेच टँकर क्रमांक एमएच-०४-बीजी-६९२४ व एमएच-०४-एच-९६४८ हे दोन्ही टँकर त्यांच्या मालकास परत करण्यात यावे असे नमुद केले आहे.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस साकीनाका पोलिस ठाणे येथील पोलिस उप निरिक्षक श्री. अशोक पोपटलाल लांडगे यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई यांचे सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, टँकर क्रमांक एमएच-०४-एफजे-२७१३ चा चालक मोहम्मद इसहाक कुरेशी व मालक नबी रजा आणि काळ्या तेलाची तस्करी करणारा मेहराज शेठ तसेच टँकर क्रमांक एमएच-०४-एच-९६४८ व एमएच-०४-बीजी-६९२४ चे चालक व मालक या सर्वांनी मिळून संगनमताने अवैध मार्गाने काळे तेल हस्तगत करुन अनधिकृतपणे त्यामध्ये भेसळ करुन ते काळ्याबाजारात अवैधमार्गाने विक्रीसाठी वापर करत असल्याचे निष्पन्न झाले असुन सदरचे तिनही टँकर्स त्यांच्या मालकास परत देण्यास सक्त हरकत असुन सदरचे टँकर्स आरोपींना परत मिळाल्यास ते पुन्हा सदरचा बेकायदेशिर धंदा चालु करतील असे नमुद केले आहे.

दिनांक ०८/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ चा चालक मोहम्मद इसाहाक कुरेशी यांनी युक्तीवाद केला की, तो टँकरचा चालक असुन त्याने सदर टँकरमध्ये फर्नेस ऑईलचा साठा मे. शुक्ला ट्रेडींग कंपनी यांचेकडून भरुन घेतला आहे. सदरचा टँकर संघर्ष नगर, चांदीवली, साकीनाका येथे उभा करुन त्यामध्ये आराम करीत असतांना पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांना काही न सांगता साकीनाका पोलिस ठाणे येथे घेऊन गेले व त्यास अटक केली. सदर गुन्हा नोंद प्रकरणी त्याचा काहीही संबंध नसुन तो निष्पाप आहे. असे नमुद केले आहे.

मे. शुक्ला ट्रेडिंग कंपनीचे मालक अशोककुमार शुक्ला यांचे दिनांक ०८/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, तो शुक्ला ट्रेडींग कंपनीचा मालक असुन चौधरी एन्टरप्रायजेस चे मालक मेहराज चौधरी यांना दिनांक ३०/०८/२०१२ रोजी टँकर क्रमांक एमएच-०४-एफजे-२७१३ द्वारे विक्री केलेल्या ४००० लिटर फर्नेस ऑईलचे कागदपत्रे त्यांचेकडे उपलब्ध आहेत. सदर टँकरचा चालक मोहम्मद इसहाक कुरेशी याने गाळा क्र. १ आणि २ नायरवाडी, खैरानी रोड, साकीनाका, अंधेरी पूर्व, मुंबई या पत्यावर वितरण केले असुन सदरचा फर्नेस ऑईलचा साठा त्यांनी इंडीयन ऑईल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम व हिंदुस्थान पेट्रोलियम या कंपनीचे अधिकृत डिलर्स असलेले मे. हरेश एजन्सी, आर जी चांडक, डी एम के पेट्रो ट्रेडर्स यांचेकडून खरेदी केले असल्याचे नमुद केले आहे.

0008

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ३१/०८/२०१२ रोजी साकीनाका पोलिस ठाणे येथील पोलिस उप निरिक्षक श्री. लांडगे यांनी पकडलेल्या ०३ टॅंकर्सची तपासणी करुन नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यासाठी सहाय्यक शिधावाटप अधिकारी, ३२/ई, कुर्ला हे शिधावाटप निरीक्षक सर्वश्री एस.आर.पवार, जी.पी. पवार यांच्या तसेच दोन पंचांसमवेत साकीनाका पोलिस ठाणे येथे उपस्थित झाले. दिनांक ३१/०८/२०१२ रोजी साकीनाका पोलिस ठाण्याचे पोलिस उप निरिक्षक श्री. अशोक लांडगे यांनी पहाटे ०३:४५ वाजता वुडलॅंड हाईटस् बिल्डिंग समोरील कंपाऊंड, संघर्षनगर, साकीनाका, मुंबई - ७२ येथे घटनास्थळी केलेला पंचनाम्यानुसार टॅंकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ चा चालक मोहम्मद इसाहाक कुरेशी व मालक नबी रजा आणि काळ्या तेलाची तस्करी करणारा मेहराज शेठ तसेच टॅंकर क्र. एमएच-०४-एच-९६४८ चा चालक व मालक आणि टॅंकर क्र. एमएच-०४-बीजी-६९२४ चा चालक व मालक असे सर्वांनी मिळून संगनमताने अवैध मार्गाने काळे तेल हस्तगत करुन अनधिकृतपणे त्यामध्ये भेसळ करुन ते काळ्याबाजारात अवैध मार्गाने विक्रीसाठी वापर करीत असल्याचे सकृतदर्शनी निष्पन्न झाल्याने, सर्व संबंधितांविरुध्द साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.नों.क्र. ३०/२०१२, दिनांक ३१/०८/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन सदर तीन टॅंकर व त्यामधील काळे तेलाचा साठा असा मिळून एकूण ३३,००,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी, प्राप्त झालेल्या जप्त मुद्देमालाच्या रासायनिक पृथ:करण अहवालात, Exhibit nos. 1 to 3 contains petroleum hydrocarbon oil having density at 30 °C 0.963, 0.963, 0.963 g/ml and flash point 74, 69 & 74 °C respectively, असे नमूद केले आहे. सदर petroleum hydrocarbon oil ही पेट्रोलियम पदार्थाची सामान्य व्याख्या असुन त्यानुसार सर्व प्रकारच्या लुब्रिकेटींग ऑईलचे बेस प्रॉडक्ट असल्याची या कार्यालयाची धारणा आहे. संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडून इतर गुन्हा नोंद प्रकरणी प्राप्त झालेला पेट्रोलियम हायड्रोकार्बन ऑईलच्या परिपूर्ण विश्लेषण अहवालात, This to inform you that the report issued by this office says that "exhibit nos. 1 and 2 contain petroleum hydrocarbon oil. This oils may be used as Transformer oil base stock " असे नमूद केले आहे. तसेच संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडून प्राप्त दुसऱ्या अहवालामध्ये, "Exhibit Nos. 1 and 2 contain paraffin oil means the exhibit nos. 1 and 2 contain

higher boiling petroleum hydrocarbon oils. These oils may be used as base oils for making lubricants." असे नमूद केले आहे. उपरोक्त अहवालाचे अवलोकन करता नमुद अहवालामधील दोन्ही पेट्रोलियम पदार्थास लुब्रिकेटींग ऑईल असे संबोधण्यात आले असुन त्यानुसार सर्व प्रकारचे लुब्रिकेटींग ऑईल हे पेट्रोलियम हायड्रोकार्बन ऑईलचे उपपदार्थ असल्याचे सिध्द होत आहे.

उपरोक्त गुन्हयातील काळे तेलचे तस्करी करणारे मेहराज चौधरी यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, ते गाळा क्र. १ आणि २ नायरवाडी, खैरानी रोड, साकीनाका, अंधेरी पूर्व, मुंबई या पत्यावर फर्नेस ऑईलचा व्यवसाय करीत असल्याचे कबुल केले आहे. सदर फर्नेस ऑईलच्या साठयाचा पुरवठा मे. शुक्ला ट्रेडींग कंपनी यांनी केल्याबाबतचे पुरावादर्शक कागदपत्रे म्हणुन खरेदी बिलांच्या छायांकित प्रती सादर केल्या आहेत. मेहराज चौधरी हे अलाहिदा पत्यावरील फर्नेस ऑईलच्या साठयाची खरेदी बिले सादर करुन सदर बिलांवरचा साठा हा घटनास्थळी जप्त केलेल्या साठयापैकीच असल्याचा दावा करुन या कार्यालयाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी पथकाने वुडलँड हाईटस् बिल्डिंग समोरील कंपाऊंड, संघर्षनगर, साकीनाका, मुंबई ७२ या नमुद ठिकाणी असलेल्या अनधिकृत अड्यावर धाड टाकुन काळे तेल व तिन टँकर जप्त केले असुन मे. शुक्ला ट्रेडींग कंपनी चे मालक अशोककुमार अरुणकुमार शुक्ला यांनी दिलेल्या जबाबात, दिनांक ३०/०८/२०१२ रोजी मे. चौधरी एन्टरप्रायजेसचे मालक मेहराज चौधरी याच्या भ्रमणध्वनीवरील ऑर्डरनुसार बिल क्र. १६७ दिनांक ३०/०८/२०१२ नुसार ४००० लिटर फर्नेस ऑईलची विक्री केली आहे. सदर फर्नेस ऑईलची डिलेव्हरी त्यांनी पाठविलेल्या टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ मधुन गाळा क्र. १ आणि २ नायरवाडी, खैरानी रोड, साकीनाका, अंधेरी पूर्व, मुंबई या पत्यावर केलेली आहे. मेहराज चौधरी यांचा घटनास्थळी पोलिसांनी पकडलेल्या मालाशी त्यांचा कोणताही संबंध नसुन वुडलॅन्ड हाईटस् बिल्डींग समोरील कंपाऊंड संघर्ष नगर, साकीनाका, मुंबई-७२ या घटनास्थळी आढळलेल्या मालाचा पुरवठा त्यांनी केलेला नसल्याचे सांगुन सदरचा बिलांवरील फर्नेस ऑईलचा साठा त्यांनी गाळा क्र. १ आणि २, नायरवाडी, खैरानीरोड, साकीनाका, मुंबई या पत्यावर डिलेव्हरी केल्याचे सांगितले आहे. उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, मेहराज चौधरी यांनी खरेदी केलेला फर्नेस ऑईलचा साठा हा त्यांनी वेगळया पत्यावर उतरवून घेतला असुन घटनास्थळी जप्त करण्यात आलेला काळे तेलाचा साठा मेहराज चौधरी यांनी गैरमार्गाने खरेदी केलेला लुब्रिकेटींग ऑईलचा साठा असल्याचे निष्पन्न होत आहे. सदर ऑईलच्या साठयामध्ये मेहराज चौधरी भेसळ करीत असतांना पोलिसांनी त्यास रंगेहात पकडले असुन घटनास्थळी जप्त करण्यात आलेला ऑईलचा साठा हा मेहराज चौधरी यांनी तस्करी मार्गाने खरेदी व

अवैधरित्या विनापरवाना साठवणुक करुन त्यामध्ये भेसळ करुन सदरचा भेसळयुक्त साठयाची बेकायदेशीर विक्री करुन उपभोक्त्यांची घोर फसवणुक केल्याचे सिध्द होत आहे. सबब, घटनास्थळी जप्त करण्यात आलेला काळे तेलचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

उपरोक्त गुन्हयात जप्त करण्यात आलेले टँकर क्रमांक एमएच-०४-एच-९६४८ व एमएच-०४-बीजी-६९२४ हे दोन्ही टँकर मेहराज चौधरी यांच्या मालकीचे तसेच टँकर क्रमांक एमएच-०४-एफजे-२७१३ हा टँकर नबी राजा यांच्या मालकीचा असल्याचा त्यांनी दावा केला आहे. सदर गुन्हा नोंद प्रकरणी नमुद तिनही टँकर हे पथकाने अनधिकृत अड्यावर भेसळयुक्त ऑईलच्या व्यवसायासाठी अवैध साठवणुक व वाहतुक करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने रंगेहाथ पकडले आहेत. मे. शुक्ला ट्रेडींग कंपनी यांनी दिलेल्या जबाबात त्यांनी फर्नेस ऑईलचा साठा हा टँकर क्रमांक एमएच-०४-एफजे-२७१३ मध्ये भरुन दिले असल्याचे तसेच त्यामधील साठा हा अलाहिदा पत्यावरील गाळ्यामध्ये वितरीत केले असल्याचे सांगितले आहे. सदरचे टँकर हे नबी राजा यांनी त्यांच्या मालकीचे असल्याचे सांगुन त्यांनी त्यांचे टँकर मेहराज चौधरी यांना दिले असल्याचे सांगुन त्यामधील जप्त साठयाबाबत त्यांचा काहीही संबंध नसल्याचे सांगितले आहे. तथापी, नबी राजा या टँकर मालकाने त्यांच्या मालकीचा टँकर हा मेहराज चौधरी यांना भाडेतत्वावर दिला होता किंवा कसे ? याचा काहीच उहापोह केला नाही. सदरचा टँकर नबी राजा यांनी त्यांचा टँकर भाडेतत्वावर न देता त्यांच्या संमतीने सदरच्या अनधिकृत अड्यावरील अवैध व्यवसायामध्ये अवैध वाहतुकीस दिल्याचे दिसुन येत असल्याने नबी राजा यांचाही सदरच्या अनधिकृत व्यवसायामध्ये सहभाग असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. टँकर क्रमांक एमएच-०४-एच-९६४८ व एमएच-०४-बीजी-६९२४ हे दोन्ही टँकर नमुद गुन्हयातील प्रमुख आरोपी तसेच काळे तेलाचे तस्करी करणारा मेहराज चौधरी यांनी त्यांच्या मालकीचा असल्याचा त्यांनी दावा केला असुन सदरचे दोन्ही टँकर हे अनधिकृत अड्यावर मिळून आले असुन त्यामध्ये काळे तेलाची साठवणुक केल्याचे दिसुन येत आहे. तपासी पोलिस अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, सदरचे तिनही टँकर त्यांचे मालकास परत दिल्यास ते पुन्हा बेकायदेशीर व्यवसायासाठी वापर करतील असे सांगुन सदरचे तिनही टँकर त्यांच्या मालकांस परत देण्यास त्यांनी सक्त हरकत घेतली आहे. तसेच टँकर क्रमांक एमएच-०४-एच-९६४८ व एमएच-०४-बीजी-६९२४ या दोनही टँकरचे मालक मेहराज चौधरी व टँकर क्रमांक एमएच-०४-एफजे-२७१३ चे मालक नबी राजा व तिनही टँकरचे चालक यासर्वांनी संगनमत करुन काळे तेलाचा अवैध व्यवसाय केल्याचे निष्पन्न झाले असल्याचे सांगितले आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर तिनही टँकरच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी

RATIONING & ... CONTROLLER OF ... MUMB

संपुर्ण रक्कम भरण्यास तिनही टँकरचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे टँकर त्यांच्या मालकांस परत करण्याचा अथवा टँकरचे मालक तेवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचे तिनही टँकर जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.नों.क्र. ३०/२०१२, दिनांक ३१/०८/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी, जप्त करण्यात आलेले टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ मधील ३८०० लिटर काळे तेल, टँकर क्र. एमएच-०४-बीजी-६९२४ मधील २०० लिटर काळे तेल व टँकर क्र. एमएच-०४-एच-९६४८ मधील ६००० लिटर काळे तेल असे मिळून एकुण १०००० लिटर काळे तेलाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेले टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३, टँकर क्र. एमएच-०४-बीजी-६९२४ व टँकर क्र. एमएच-०४-एच-९६४८ ही वाहने शासनजमा करण्यात येत आहेत. सदर वाहनांच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहने त्यांच्या मालकास परत करण्यात यावेत व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

४) अथवा वाहनांचे मालक सदरची प्रत्येकी रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "८४४३" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ चा चालक मोहम्मद इसाहाक कुरेशी
२) टँकर क्र. एमएच-०४-एफजे-२७१३ चा मालक नबी रजा
३) काळ्या तेलाची तस्करी करणारा मेहराज शेठ
४) टँकर क्र. एमएच-०४-एच-९६४८ चा चालक
५) टँकर क्र. एमएच-०४-एच-९६४८ चा मालक
६) टँकर क्र. एमएच-०४-बीजी-६९२४ चा चालक
७) टँकर क्र. एमएच-०४-बीजी-६९२४ चा मालक
८) मे. शुक्ला ट्रेडिंग कंपनी, स्वस्तीक इंडस्ट्रियल इस्टेट, गाला नं. एम-३, धरम कटाच्या मागे, मिरा भाईंदर रोडं, भाईंदर (पूर्व), जिल्हा ठाणे - ४०१ १०५.
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्यांची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव
४) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.